# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

Web portal : hinduprakashwarta.com

छत्रपती संभाजीनगर ❁ शनिवार, दि. १८ जुलै २०२६ ❁ वर्ष : १ ❁ अंक : ८८ ❁ पाने : ४ ❁ किंमत : ४ रू. ❁ Email : hinduprakashvarta@gmail.com


## कोथिंबिरीच्या जुडीला तब्बल 285 रुपये; पालेभाज्यांचे भाव गगनाला

नाशिक : पावसाने ओढ दिल्यामुळे भाजीपाल्याची आवक घटली असून त्याचा थेट परिणाम पालेभाज्यांच्या दरावर झाला आहे. नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीतील लिलावात कोथिंबिरीच्या एका जुडीला तब्बल २८५ रुपयांचा उच्चांकी दर मिळाला. त्यामुळे सर्वसामान्यांच्या जेवणातील कोथिंबीर आता महागडी ठरू लागली आहे. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. जून महिना

## कोरोनाचे 339 रुग्ण; केरळ, महाराष्ट्र, तामिळनाडूत आरोग्य विभाग सतर्क

**नवी दिल्ली :** देशभरात आतापर्यंत अंदाजे ३३९ रुग्ण आढळले आहेत. केरळमध्ये सर्वाधिक ११५ रुग्ण आढळले असून, त्याखालोखाल कर्नाटकात ६४, महाराष्ट्रात ४३ आणि तामिळनाडूमध्ये ३९ रुग्ण आहेत.आंध्र प्रदेशात पुन्हा कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. राज्यात कोरोनाचे १२ पॉझिटिव्ह रुग्ण आढळले असून त्यापैकी चार संक्रमित व्यक्तींचा मृत्यू झाल्याची माहिती राज्याच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे सचिव जी. वीरपांडियन यांनी सांगितले.

## थोडक्यात वार्ता

### प्रसिद्ध दुगारवाडी धबधबा अनिश्चित काळासाठी बंद



**नाशिक :** दुगारवाडी धबधब्यावर तुम्ही फिरायला जात असाल तर थांबा कारण दुगारवाडी धबधब्याविषयी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. नाशिक त्र्यंबकेश्वर रस्त्यावरती असलेला दुगारवाडी येथील धबधबा हा अनिश्चित काळासाठी बंद करण्याचा निर्णय वनविभागाने घेतला असून त्याबाबतचा आदेश हा काढण्यात आला आहे, त्यामुळे पावसाळ्यामध्ये दुगारवाडीचा धबधबा हा आता अनिश्चित काळासाठी बंद झाला आहे. पावसाळा चालू झाला की फिरस्तीची संख्या वाढते. निसर्गरम्य ठिकाणी पर्यटक मोठी गर्दी करत असतात. नाशिकमध्येही पावसाने हजेरी लावल्याने डोंगर , धबधब्यांवर आकर्षक दृश्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे हे बघण्यासाठी पर्यटक गर्दी करताना दिसत आहे. दरम्यान अशावेळेस काळजी न घेतल्यास दुर्घटना होण्याच्याही घटना घडतात. अशीच एक दुर्घटना नाशिक - त्र्यंबकेश्वर रोडवरील दुगारवाडी येथील धबधब्यावर घडली आहे.

### उमाळा घाटात भीषण अपघात, दोन ठार, चार गंभीर

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावर भीषण अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावरील उमाळा घाटात गुरुवारी रात्री झालेल्या भीषण मोटार अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झालेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जळगावकडे येणारी मोटार छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून भरधाव वेगाने प्रवास करत होती. दरम्यान, महामार्गावरील उमाळा घाट उतरताना रस्त्याच्या कडेला अथवा मार्गावर मालवाहू मोटार उभी असल्याचे चालकाच्या निदर्शनास आले.अपघात होईल या भीतीने चालकाने तात्काळ ब्रेक लावले मात्र वाहनाचा वेग अधिक असल्याने मोटारीवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे मोटार थेट रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघात इतका भीषण होता की, मोटारीचा मोठ्या प्रमाणात चक्काचूर झालाय.

### नागरिकत्व ठरविण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** मतदार यादीत नाव नसल्यामुळे किंवा पुनरीक्षणादरम्यान नाव वगळल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नोंदवले. नागरिकत्व निश्चित करण्याचा अधिकार हा निवडणूक आयोगाकडे नसून त्यासाठी स्वतंत्र कायदेशीर प्रक्रिया आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाशी (एसआयआर) संबंधित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे मत व्यक्त केले. गेल्या काही महिन्यांपासून देशातील विविध राज्यांमध्ये मतदार याद्यांचे पुनरीक्षण सुरू असून, त्यातून अनेकांची नावे वगळली गेल्याने नागरिकत्वाबाबत संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.न्यायालयाने स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाची घटनात्मक जबाबदारी मतदार याद्या तयार करणे, त्यांचे पुनरीक्षण करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे इतकीच मर्यादित आहे.

### "शाल जोडे"




## मुख्याध्यापिकेचा हातात धारदार शस्त्रे घेऊन वर्गात शिरल्याने मुलांमध्ये भीतीचे वातावरण; चौकशी सुरु

उत्तर प्रदेशातील एका शाळेत मुख्याध्यापिका चक्क हातात चाकू आणि कोयता यांसारखी धारदार शस्त्रे घेऊन प्रवेश केल्याची एक अत्यंत खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे शाळेतील निष्पाप विद्यार्थ्यांमध्ये आणि इतर कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड घबराट पसरली. ही घटना ऑनलाइन माध्यमातून समोर येताच पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाने तातडीने पावले उचलत घटनास्थळ गाठले आणि संबंधित मुख्याध्यापिकेवर कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेची गांभीर्याने दखल घेत पोलीस अधिकारी आणि गट शिक्षण अधिकारी (बीईओ) नीरज उमराव यांनी तातडीने शाळेत पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. पोलिसांनी शाळेच्या आवारातून मुख्याध्यापिकेकडे असलेला चाकू आणि कोयता जप्त केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सत्यता आणि पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी उपस्थित शिक्षक, इतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. एका पालकाने दिलेल्या



माहितीनुसार, या मुख्याध्यापिकेने शाळेत प्रवेश करण्यापूर्वी मुख्य प्रवेशद्वाराजवळ काही पालकांनाही ही धारदार शस्त्रे दाखवून धमकावण्याचा प्रयत्न केला होता.

या धक्कादायक कृत्याबाबत जेव्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापिका शिखा सिंग यांची चौकशी केली, तेव्हा तिने शाळेत चाकू आणि कोयता आणल्याची कबुली दिली. मात्र, स्वतःला कोणापासून तरी धोका असल्यामुळे सुरक्षेसाठी ही शस्त्रे बाळगल्याचा अजब दावा तिने केला आहे. विशेष म्हणजे, आपल्याला नेमकी कोणाकडून धमकी मिळाली होती किंवा त्या धमकीचे स्वरूप काय होते, याची कोणतीही स्पष्ट माहिती तिने अधिकाऱ्यांना दिली नाही. त्यामुळे शैक्षणिक संस्थेसारख्या पवित्र ठिकाणी शस्त्रे आणून सुरक्षिततेच्या नियमांचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी तिच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्हा प्राथमिक शिक्षण अधिकारी (बीएसए) कमलेंद्र कुशवाह यांनी या घटनेला दुजोरा दिला असून दोषी मुख्याध्यापिकेवर कडक कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती दिली आहे. पोलिसांनी मुख्याध्यापिकेविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली असून, शिक्षण विभागाने तिला तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यासाठी विभागीय कारवाई सुरू केली आहे. तपासाचा एक भाग म्हणून अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापिकेच्या पतीशीही संपर्क साधला असता, त्यांनी ती मानसिक आरोग्याशी संबंधित काही समस्यांनी त्रस्त असण्याची शक्यता वर्तवली आहे.

## इच्छामरणासाठी राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांत समित्या स्थापन करणार

### सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही; खासगी रुग्णालयांचाही समावेश

**मुंबई :** मागील काही वर्षांपासून महाराष्ट्रासह देशभरात 'इच्छामरण' (पॅसिव्ह युथनेशिया) मागणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. अशा अत्यंत संवेदनशील प्रकरणांमध्ये तातडीने आणि योग्य निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये विशेष वैद्यकीय समित्या स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. हरिश राणा निष्क्रिय इच्छामरण प्रकरणात ऐतिहासिक निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने देशभरात अशी यंत्रणा उभारण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या याच आदेशाला अनुसरून महाराष्ट्र शासनाने ही कार्यवाही केली असून, यामुळे इच्छामरणाच्या अर्जांवर निर्णय घेण्यासाठी आता एक निश्चित कार्यपद्धती उपलब्ध होणार आहे.



सार्वजनिक आरोग्य विभागाकडून शुक्रवारी या संदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी करण्यात आला आहे. या निर्णयानुसार, राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अध्यक्षतेखाली 'प्राथमिक वैद्यकीय समिती' कार्यरत असेल, तर जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अध्यक्षतेखाली 'द्वितीय वैद्यकीय समिती' स्थापन केली जाणार आहे. शासकीयच नव्हे, तर खासगी रुग्णालयांनाही या कक्षेत आणण्यात आले असून, तेथेही संबंधित रुग्णालयांचे प्रशासक आणि संचालक यांच्या अध्यक्षतेखाली अशाच प्रकारच्या दोन समित्या स्थापन करण्याचे बंधनकारक निर्देश राज्य सरकारने दिले आहेत.

जेव्हा एखादी व्यक्ती असाध्य आणि अत्यंत गंभीर व्याधीने ग्रस्त असते आणि दीर्घकाळ बेशुद्धावस्थेत राहते, तेव्हा तिच्याकडे स्वतः निर्णय घेण्याची क्षमता उरत नाही. अशा वेळी मरणप्राय यातना भोगत कृत्रिम यंत्रणेवर जगण्यापेक्षा शांतपणे मरण यावे, यासाठी ती व्यक्ती सुस्थितीत असतानाच तसा कायदेशीर अर्ज करून ठेवू शकते. इच्छामरणामध्ये संबंधित गंभीर रुग्णाला देण्यात येत असलेला कृत्रिम श्वासोच्छ्वास (व्हेंटिलेटर) अथवा अन्य प्रकारची जीवनरक्षक प्रणाली वैद्यकीय निकषांच्या आधारे बंद केली जाते आणि त्या व्यक्तीला नैसर्गिक मृत्यूकडे नेले जाते.

## एसटीचा प्रवास महागला; १३.५६ टक्के भाडेवाढ

### डिझेल दरवाढीसह वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**मुंबई :** ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस प्रवासाच्या तिकिटांचे दर आता वाढणार आहेत. राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटी महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावाला अंतिम मान्यता दिली आहे. अखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, कर्मचाऱ्यांच्या भत्त्यांमधील वाढ आणि गाड्यांच्या देखभालीचा वाढता खर्च यांमुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिली. या नव्या निर्णयामुळे प्रवाशांच्या खिशाला झळ बसणार असली, तरी यापूर्वी लागू केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. (Pratap Sarnaik)

वाढत्या खर्चाचा भार सहन करत राज्यातील लाखो प्रवाशांना अविरत सेवा देणाऱ्या एसटीच्या दैनंदिन कामकाजावर प्रचंड आर्थिक ताण निर्माण झाला होता. त्यामुळे ही सार्वजनिक सेवा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाला अखेर दरवाढीचा निर्णय घ्यावा लागला आहे. ही भाडेवाढ करताना प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडेल, याची काळजी घेण्यात आल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. त्यासोबतच एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ, वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यामुळे महामंडळाचा एकूणच परिचालन खर्च वाढला आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटी महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

## राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे सर्वेक्षण होणार

### उद्योगांबाबत सर्व परवानग्यांसाठी मैत्री पोर्टलचा उपयोग बंधनकारक

**मुंबई :** राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे सर्वेक्षण करून या क्षेत्राची परिसंस्था (इकोसिस्टिम) निर्माण करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले. त्याशिवाय महाराष्ट्रात येणाऱ्या गुंतवणुकीचे रूपांतर उद्योगांमध्ये करण्यासाठी गुंतवणूकक्षम आणि रोजगार निर्मितीची क्षमता असलेल्या क्षेत्रांसाठी सर्वंकष धोरणे आणावीत, असेही त्यांनी सूचित केले. (Ecosystem)

वर्षा निवासस्थानी उद्योग विभागाच्या विविध धोरणांच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीला उद्योग मंत्री उदय सामंत उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांमध्ये गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या आवश्यकतेनुसार क्षेत्रे निश्चित करावी. या क्षेत्रांच्या संभाव्यतेनुसार एमएसएमई उद्योगांच्या रोजगार निर्मिती व उत्पादन क्षमतेमध्ये वाढ करावी. त्यासाठी विविध प्लॅटफॉर्म्स तयार करावीत. या क्षेत्राच्या उत्थानासाठी नवनवीन तंत्रज्ञान आणावे. हे सर्वात मोठे रोजगार निर्मिती देणारे क्षेत्र असल्यामुळे या क्षेत्राच्या विकासासाठी काम करावे. एमएसएमई उद्योगांचे सर्वेक्षण करताना त्यांची सद्यस्थिती, रोजगार निर्मितीची क्षमता, सध्या असलेली रोजगार निर्मिती आणि उत्पादन या सर्वांचा अभ्यास करण्यात यावा.


## शिवना परिसरातील मिरची पिकावर ‘कोकडा’ रोगाचा कहर; शेतकरी चिंतेत

हिंदु प्रकाश वार्ता / सय्यद जमीर

**अजिंठा :** सिल्लोड तालुक्यातील शिवना व परिसरातील गावांमध्ये मिरची पिकावर सध्या दुहेरी संकट ओढवले आहे. एकीकडे ‘कोकडा’ (लीफ कर्ल) रोगाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत आहे, तर दुसरीकडे सलग पाऊस न झाल्यामुळे शेतातील ओलावा मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. परिणामी मिरचीची वाढ खुंटत असून शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

शिवना परिसर हा मिरची उत्पादनासाठी ओळखला जातो. यंदा चांगल्या उत्पादनाच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मिरचीची लागवड केली होती. मात्र, पावसाने दडी मारल्याने त्यांच्या अपेक्षांवर

-> पान 2 वर



**"यावर्षी वेळेवर पाऊस न झाल्यामुळे मिरची पिकाचे मोठे नुकसान होत आहे. शेतात पुरेसा ओलावा नसल्याने झाडांची वाढ खुंटली आहे. पांढऱ्या माशीमुळे कोकडा रोग झपाट्याने पसरत आहे. खत, औषधे, मजुरी आणि सिंचनावर मोठा खर्च करूनही पीक अपेक्षेप्रमाणे वाढत नाही. लवकर चांगला पाऊस झाला नाही आणि प्रशासनाने मदतीसाठी पुढाकार घेतला नाही, तर मिरची उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागेल. कृषी विभागाने तातडीने सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन व आवश्यक मदत द्यावी."**

**शेख मुशर्रफ, मिरची उत्पादक शेतकरी, शिवना**

## शाहू विद्यालय येथील शालेय पोषण आहारात चक्क किडे; 40 पोते तांदूळ शील बंद

हिंदु प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी :** पूर्णा तालुक्यातील आहेरवाडी येथील राजश्री शाहू विद्यालय शालेय पोषण साठवून ठेवलेले अन्नधान्यांमध्ये चक्क किडे व जाळे आढळून आल्याचे पोहोचताच मोठी खळबळ उडाली व शिक्षण विभाग खडबडून जागे झाले आहेरवाडी ग्रामस्थांनी जिल्हा परिषद विभागाकडे लेखी तक्रार केल्यानंतर 15 जुलै रोजी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शाळेत प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली याबाबत सविस्तर माहिती अशी की आहेरवाडी येथील राजश्री शाहू महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात गेल्या अनेक दिवसापासून किडे व जाळे असलेले अन्नधान्य पोषण आहारात वापरले जात असल्याचे वारंवार तक्रार करूनही याकडे शिक्षण विभागकाना डोळा करत होता सर्व प्रकरणाचा व्हिडिओ व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर गटशिक्षणाधिकारी किरण सुरोडवाड, विस्तार अधिकारी बालाजी कापशीकर केंद्रप्रमुख सुभाष शिंदे आदीच्या पथकाने दुपारी दीडच्या सुमारास शाळेची प्रत्यक्षपाहणी केली असता दरम्यान पोषण आहारासाठी ठेवण्यात आलेल्या अन्नधान्याचा साठ्यातील 42 पोत्यां मध्ये धान्य साठ्यामध्ये चक्क किडे व जाळे आढळून आल्याने तपासणीसाठी गेलेले अधिकाऱ्यांनी धान्य साठवणूक पक्षाला सीलबंद करण्याचे निर्देश दिले यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांना विचारणा केली असता संबंधित तांदूळ हा जुना साठा असल्याचे त्यांनी सांगितले असल्याचे माहिती मिळाली या प्रकरणाबाबत मुख्याध्यापकांनी अधिकृत खुलासा केलेला नाही गटशिक्षणाधिकारी किरण शिरोडवाड यांनी सांगितले की मुख्याध्यापकाकडून सविस्तर खुलासा अहवाल मागविण्यात आला असून तो प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात येईल या संदर्भात मुख्याध्यापकांनी खुलासा अहवाल सादर करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात दोन वेळेस भेट देऊन तरी त्यांचा अहवाल अद्याप स्वीकारण्यात आलेला नसल्याचे त्यांनी सांगितले शालेय पोषण आहाराच्या मोठा पेच प्रसंग निर्माण झाला आहे या प्रकरणाला शालेय प्रशासन जबाबदार असल्याचे ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू असून अंतिम निर्णयाकडे व ग्रामस्थांचे लक्ष लागले असून शिक्षण विभाग काय निर्णय घेतो हे पहावे लागेल.

## राज्यातील उत्कृष्ट तपासांचा यादीत नाशिक पोलिसांचा 'हा' तपास; डीजीपींच्या अधिकृत अभ्यासपुस्तिकेत थेट समावेश

**नाशिक :** मोबाईल सीडीआर नाही, सीसीटीव्ही फुटेज नाही आणि प्रत्यक्ष साक्षीदारही नाही तरीही अवघ्या एका रेल्वे तिकिटाच्या तुकड्यावरून नाशिक पोलिसांनी सात दिवसांत हरियाणातून मारेकऱ्यांना गजाआड केलेला तपास आता संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस अधिकाऱ्यांसाठी अभ्यासाचा विषय ठरला आहे.

पाथर्डी फाटा परिसरातील योगेश मोगरे हत्याकांडाचा तपास महाराष्ट्र पोलीस महासंचालकांनी राज्यस्तरीय उत्कृष्ट गुन्हे अन्वेषणाच्या केस स्टडीत समाविष्ट केला आहे. कोणतेही डिजिटल पुरावे नसताना तत्कालीन सहायक पोलीस आयुक्त आनंदा वाघ, सहायक निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते, पीएसआय पोपट कारवाळ आणि हवालदार प्रशांत वालझाडे यांच्या पथकाने केवळ पारंपरिक तपास पद्धतीचा आधार घेत हा गुन्हा उघडकीस आणला.

एका तिकिटावरून शोधले आरोपी

गुन्ह्याची कोणतीही पार्श्वभूमी नसताना घटनास्थळी मिळालेल्या एका तिकिटाची बारीक लिंक जोडत या पथकाने थेट हरियाणातील गुन्हेगारीचे केंद्र समजले जाणारे सोनपत आणि रोहतक गाठले आणि दोन्ही संशयित मारेकऱ्यांना जेरबंद केले होते. यामध्ये ३० मार्च २०२३ रोजी पहिल्या विधिसंघर्षित संशयिताला ताब्यात घेण्यात आले तर ४ एप्रिल २०२३ रोजी मुख्य संशयितास अटक करून मोगरे यांची कार जप्त काण्यात आली.

## गावोगावी स्वच्छतेचे धडे... जिल्हा परिषद मुख्यालयातच कचऱ्याचे साम्राज्य

### स्वच्छतागृहाशेजारीच मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्याचा प्रकार; 'स्वच्छतेचा संदेश देणारे' मुख्यालयच अस्वच्छ

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोरं

**छत्रपती संभाजीनगर :** एकीकडे जिल्हा परिषद प्रशासन ग्रामीण भागात विशेष स्वच्छता मोहिमा राबवत गावोगावी स्वच्छतेचा संदेश देत आहे, तर दुसरीकडे त्याच जिल्हा परिषद मुख्यालयाच्या परिसरात स्वच्छतागृहालगत मोठ्या प्रमाणात कचरा आणून टाकला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. स्वच्छतागृहाशेजारी प्लास्टिक, झाडांच्या फांद्या, थर्माकोल, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या आणि इतर घनकचऱ्याचे ढीग साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून प्रशासनाच्या





स्वच्छता व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे हा कचरा एखाद्या दिवसाचा नसून तो नियमितपणे या ठिकाणी आणून टाकला जात असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येत असतात. अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी यांचीही मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा ठिकाणी स्वच्छतागृहालगतच कचऱ्याचे ढीग साचलेले दिसणे हे प्रशासनासाठी लाजिरवाणे चित्र मानले जात आहे.

जिल्हा परिषदेमार्फत गावागावांत स्वच्छता, प्लास्टिकमुक्ती आणि घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती केली जाते. ग्रामपंचायतींना स्वच्छतेबाबत सूचना दिल्या जातात. मात्र, ज्या कार्यालयातून संपूर्ण जिल्ह्याला स्वच्छतेचे धडे दिले जातात, त्याच कार्यालयात स्वच्छतेच्या नियमांचे पालन होत नसल्याचे चित्र समोर आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

पावसामुळे कचरा कुजल्याने त्या ठिकाणी दुर्गंधीसह डास, माशा आणि इतर कीटकांची वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी कर्मचारी, अधिकारी आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. स्वच्छतागृह परिसरातच कचरा साचल्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्वच्छ भारत अभियान आणि स्वच्छ कार्यालयाचा संदेश देणाऱ्या जिल्हा परिषदेने सर्वप्रथम स्वतःचे मुख्यालय स्वच्छ ठेवणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात स्वच्छतागृहाशेजारीच कचरा टाकला जात असल्याचे चित्र प्रशासनाच्या दाव्यालाच छेद देणारे आहे. त्यामुळे मुख्यालय परिसरातील कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी जबाबदार विभागाने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## गुन्हेगारांच्या पळवाटा रोखणारा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

एखाद्या खुनाच्या प्रकरणात मृतदेह सापडला नाही, तर आरोपी निर्दोष सुटू शकत नाही, हा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल देशाच्या न्यायदानाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा टप्पा आहे. अनेकदा गुन्हेगार गुन्ह्याचे पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेहाची विल्हेवाट लावतात आणि 'मृतदेहच सापडला नाही तर खून कसा सिद्ध होणार?' या तांत्रिक पळवाटेचा गैरफायदा घेऊन कायद्याच्या कचाट्यातून सुटण्याचा प्रयत्न करतात. सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयाने गुन्हेगारांची ही सर्वात मोठी पळवाट आता कायमची बंद केली आहे. न्यायमूर्तींनी स्पष्ट केले आहे की, खुनाच्या गुन्ह्यात मृतदेह सादर करणे ही कायद्याची अनिवार्य अट असू शकत नाही; तर गुन्हा घडल्याचा ठोस आणि परिस्थितीजन्य पुराव्यांची मजबूत साखळी असणे अधिक आवश्यक आहे. न्यायालयाने 'कॉर्पस डेलिक्टी' या कायदेशीर संकल्पनेचा केलेला सखोल आणि तर्कशुद्ध अर्थ हा तपास यंत्रणांचे मनोधैर्य वाढवणारा आहे. याचा अर्थ केवळ 'गुन्हा घडला आहे' इतकाच मर्यादित असून, मृतदेह सापडणे म्हणजेच गुन्हा सिद्ध होणे असा होत नाही. जर न्यायव्यवस्थेने मृतदेह सापडण्याचीच अट अनिवार्य ठेवली असती, तर अत्यंत चलाखीने पुरावे नष्ट करण्यात यशस्वी झालेल्या गुन्हेगारांना मोकळे रान मिळाले असते. खुनाच्या खटल्यात संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाला आहे आणि तो मृत्यू दुसऱ्या व्यक्तीच्या गुन्हेगारी कृत्यामुळेच झाला आहे, या दोन गोष्टी पुराव्यानिशी सिद्ध करणे पुरेसे आहे, हा न्यायालयाचा दृष्टीकोन अत्यंत व्यावहारिक आणि न्याय्य आहे. आसाममधील २०१५ मधील एका प्रकरणाचा दाखला देत न्यायालयाने ज्या प्रकारे एका १० वर्षीय मुलीच्या हत्येप्रकरणी आरोपीला दोषी ठरवले, ते कौतुकास्पद आहे. या प्रकरणात जरी तपास यंत्रणेला नदीतून मृतदेह शोधण्यात यश आले नसले, तरी साक्षीदाराचा विश्वासार्ह जबाब आणि २२ दिवस मुलगी बेपत्ता असतानाही आरोपीने कोणतेही ठोस स्पष्टीकरण न देणे, ही पुराव्यांची साखळी गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेशी ठरली. केवळ मृतदेह न सापडल्यामुळे एका नराधमाला सोडून देणे हे न्यायव्यवस्थेच्या आणि समाजाच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरले असते. सर्वोच्च न्यायालयाच्या या संवेदनशील आणि करड्या भूमिकेमुळे भविष्यातील अनेक जटिल आणि गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये तपास यंत्रणांना अधिक आत्मविश्वासाने तपास करता येईल आणि पीडितांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देता येईल.

# शिक्षकांना नव्हे सुशिक्षित बेरोजगारांना संधी द्या

राज्यातील शिक्षण व्यवस्थेसमोर सध्या एक गंभीर प्रश्न उभा आहे. एका बाजूला विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे, तर दुसऱ्या बाजूला त्याच शिक्षकांना बीएलओ, एसआयआर, जनगणना, सर्वेक्षण आणि इतर प्रशासकीय कामांमध्ये गुंतवून वर्गापासून दूर ठेवले जात आहे. परिणामी, विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन विस्कळीत होत असून त्याची मोठी किंमत विद्यार्थ्यांच्या भविष्याला मोजावी लागत आहे.

शिक्षक हा केवळ सरकारी कर्मचारी नसून तो समाजाचा ज्ञानदूत आहे. त्याचे प्रमुख कर्तव्य विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे आहे. मात्र, वारंवार अशैक्षणिक कामांसाठी नियुक्ती केल्याने अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही, विद्यार्थ्यांच्या शंकानिरसनासाठी वेळ मिळत नाही आणि मूल्यमापन प्रक्रियाही प्रभावित होते. विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे सर्वाधिक नुकसान होऊन ते दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहत आहेत.



याचवेळी राज्यात लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुण रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. शासनाने त्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन बीएलओ व इतर प्रशासकीय कामांमध्ये करार तत्त्वावर किंवा मानधनावर संधी दिल्यास एकाच वेळी दोन प्रश्न सुटू शकतात. विद्यार्थ्यांना नियमित शिक्षक मिळतील आणि बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

शिक्षण हा कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. त्या पायालाच कमकुवत करणारे निर्णय भविष्यासाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे शासनाने शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून तातडीने मुक्त करून स्वतंत्र यंत्रणा उभारावी. विद्यार्थ्यांचे हित, शिक्षकांचा सन्मान आणि बेरोजगारांच्या रोजगाराचा प्रश्न या तिन्ही बाबींचा समतोल साधणारा हा निर्णय ठरेल.

*शिक्षक हा राष्ट्रनिर्माता असतो; त्याला वर्गाबाहेर ठेवणे म्हणजे राष्ट्राचे भविष्य वर्गाबाहेर ठेवणे होय.*

*देशाचे भविष्य वर्गात घडविणाऱ्या शिक्षकांच्या हातात मतदार याद्या आहेत ही शोकांतिका आहे.*

आज शिक्षण व्यवस्था एका गंभीर वळणावर उभी आहे.

*शिक्षकाचे पहिले आणि सर्वोच्च कर्तव्य म्हणजे विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणे.*

वर्गातील प्रत्येक तास विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अमूल्य क्षण असतो. तोच वेळ जर अशैक्षणिक कामांमध्ये खर्च झाला, तर त्याची भरपाई कोण करणार?

*निवडणुका पुन्हा होतील, याद्या पुन्हा तयार होतील; पण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात गेलेला तास कधीच परत येणार नाही.*

राज्यात लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुण रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन बीएलओ व इतर प्रशासकीय कामांमध्ये संधी दिल्यास शिक्षक अध्यापनावर पूर्ण लक्ष केंद्रित करू शकतील आणि बेरोजगारांनाही रोजगार मिळेल. हा निर्णय शिक्षण आणि रोजगार या दोन्ही क्षेत्रांसाठी लाभदायक ठरेल.

शिक्षकांचा वेळ विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणे व प्रशासनासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करावे. कारण...

शिक्षक वर्गात असेल तरच विद्यार्थी घडेल; विद्यार्थी घडला तरच देश घडेल.

**अनिता चव्हाण-राठोड**
कै. गुरुदयालसिंग राठोड प्रा.माध्य व उच्च माध्य आश्रमशाळा, गराडा, कन्नड, छत्रपती संभाजीनगर

# ज्ञान आणि कौशल्य यांचा समन्वयच उत्कृष्ट कार्याचा पाया – कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

**हिंदु प्रकाश वार्ता. प्रतिनिधी.**





**परभणी.:** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे भारतीय कृषि अनुसंधान परिषद (आयसीएआर - ICAR) पुरस्कृत एससी-एसपी व टीएसपी अंतर्गत 'भविष्याभिमुख कौशल्य विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम' (Future-Ready Skill Development Certificate Courses) या दोन दिवसीय कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक १७ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाले. हा प्रशिक्षण कार्यक्रम दि. १७ व १८ जुलै २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

या कौशल्य विकास उपक्रमांतर्गत प्रामुख्याने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच इतर सर्व प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगार, उद्योजकता आणि आधुनिक कृषि क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगाभिमुख ज्ञान आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर, स्पर्धात्मक आणि रोजगारक्षम बनविणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि यंत्र शिक्षण (Machine Learning), ब्लॉकचेन व्यवस्थापन (Blockchain Management), पायथन प्रोग्रामिंग (Python Programming) आणि इंटरनेट ऑफ थिंग्स (Internet of Things - IoT) या विषयी सविस्तर प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे अभासी माध्यमाद्वारे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे व संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार उपस्थित होते. व्यासपीठावर कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. राहुल रामटेके, आयसीएआरचे विद्यापीठ नोडल अधिकारी तथा कृषि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. सचिन मोरे, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. संतोष कदम, शैक्षणिक प्रभारी डॉ. रणजीत चव्हाण तसेच न्यू इंडिया पब्लिशिंग एजन्सी (NIPA), नवी दिल्लीचे प्रशिक्षक श्री. राजकुमार पंडित आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले की, कौशल्य विकास हा केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नसून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठीही तितकाच महत्त्वाचा आहे. कोणतेही उत्कृष्ट कार्य करण्यासाठी ज्ञानाबरोबरच कौशल्याची जोड आवश्यक असते. विद्यापीठ विद्यार्थी, अधिकारी व प्राध्यापकांच्या कौशल्यवृद्धीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असून भारतीय कृषि अनुसंधान परिषद तसेच महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने अनेक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. विद्यापीठाने प्राध्यापक व विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील प्रशिक्षणासाठीही संधी उपलब्ध करून दिली असून त्याचा लाभ संशोधन व शिक्षण कार्यात होत आहे. या प्रशिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानाचा समाजहितासाठी प्रभावी उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांकडे ज्ञान असते; मात्र त्या ज्ञानाला कौशल्याची जोड मिळणे आवश्यक असते. या प्रशिक्षणामुळे ज्ञानाबरोबरच कौशल्यातही निश्चितच भर पडेल आणि संशोधन तसेच दैनंदिन जीवनात आवश्यक असलेले सूक्ष्म फरक ओळखण्याची क्षमता विकसित होईल. प्रत्येक व्यक्तीकडे बुद्धिमत्ता असते; परंतु तिचे योग्य प्रशिक्षण झाल्यास कार्यक्षमता अधिक प्रभावी होते, असे माननीय कुलगुरू नेहमी सांगतात, असे त्यांनी नमूद केले. विविध अधिकाऱ्यांच्या समन्वयाने घटकांनी एकत्रितपणे आयोजित केलेला हा कार्यक्रम एकात्मतेचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे सांगत त्यांनी "6 Ps – Prior Proper Planning Prevents Poor Performance" या सूत्राचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून दिले.

संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, केवळ शैक्षणिक पदवी पुरेशी नसून त्यास कौशल्याची जोड आवश्यक आहे. कृषि व कृषि संलग्न क्षेत्रांतील विविध समस्या सोडविण्यासाठी ज्ञानासोबत व्यावहारिक कौशल्य आवश्यक असून त्यासाठी सातत्यपूर्ण प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. विद्यापीठाच्या वर्षभराच्या पाठपुराव्यानंतर भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत हा कौशल्य विकास कार्यक्रम मंजूर झाला असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. कौशल्यविकासामुळे विद्यार्थ्यांची क्षमता विकसित होऊन ते नोकरी मागणारे नव्हे तर रोजगारनिर्मिती करणारे बनू शकतात. आजच्या स्पर्धात्मक युगात डिजिटल साक्षरता, उच्च शिक्षण आणि सातत्यपूर्ण कौशल्यविकास यांना विशेष महत्त्व असून या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाविषयीही सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्वागतपर भाषणात अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य यांनी सांगितले की, या प्रशिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) यासह विविध आधुनिक आणि भविष्योन्मुख विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. महाविद्यालयीन शिक्षणासोबत कौशल्यविकास आवश्यक असून केवळ ज्ञान आणि कठोर परिश्रम पुरेसे नसतात; त्यास कौशल्याची जोड असणे आवश्यक आहे. कौशल्यामुळे ज्ञानाची व्याप्ती वाढते तसेच कोणत्याही परिस्थितीचे प्रभावी व्यवस्थापन करण्याची क्षमता विकसित होते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयसीएआरचे विद्यापीठ नोडल अधिकारी तथा कृषि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. सचिन मोरे यांनी केले. त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार बहुविषयक शिक्षण, उद्योगाभिमुखता आणि कौशल्यविकासाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यानुसार भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत विद्यापीठाने विविध उपक्रम हाती घेतले असून या प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावरील संस्थांची पडताळणी करून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या न्यू इंडिया पब्लिशिंग एजन्सी (NIPA), नवी दिल्ली या संस्थेची निवड करण्यात आली आहे.

या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात न्यू इंडिया पब्लिशिंग एजन्सी (NIPA), नवी दिल्लीचे प्रशिक्षक श्री. राजकुमार पंडित विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहेत.

सूत्रसंचालन डॉ. अनुराधा लाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. रणजीत चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास कृषि, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, सामुदायिक विज्ञान, अन्न तंत्रज्ञान आणि उद्यानविद्या महाविद्यालयांतील ५७५ हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# धावत्या एसटी बसने घेतला अचानक पेट; चालकाच्या प्रसंगावधानामुळे ३८ प्रवासी सुखरूप

**हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी**



**छत्रपती संभाजीनगर :** धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील सांजखेडा शिवारात एक मोठी दुर्घटना टळली. छत्रपती संभाजीनगरहून बीडकडे जाणाऱ्या एका धावत्या एसटी बसला अचानक भीषण आग लागली. मात्र, बस चालकाने दाखवलेले प्रसंगावधान आणि एका जागरूक नागरिकाच्या सतर्कतेमुळे बसमधील ३८ प्रवासी सुखरूप बचावले असून, मोठी जीवितहानी टळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एसटी बस छत्रपती संभाजीनगरहून बीडच्या दिशेने जात असताना सांजखेडा शिवारात बसच्या मागील बाजूने अचानक दाट धूर निघू लागला. याच दरम्यान मागून स्वतःच्या वाहनाने प्रवास करणारे श्रीगोंदा येथील प्राचार्य अमोल नागवडे यांच्या ही बाब निदर्शनास आली. त्यांनी तातडीने पुढे जाऊन एसटी बसच्या चालकाला बसने पेट घेतल्याची माहिती दिली. धूर निघत असल्याची माहिती मिळताच एसटी चालकाने क्षणाचाही विलंब न करता बस रस्त्याच्या कडेला थांबवली. चालकाने तत्परता दाखवत बसमधील सर्व ३८ प्रवाशांना तातडीने आणि सुरक्षितपणे खाली उतरवले. प्रवाशांना खाली उतरवल्यानंतर काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. सुदैवाने या घटनेत सर्व प्रवासी पूर्णपणे सुरक्षित असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. बसला आग लागण्याचे नेमके कारण मात्र अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. या घटनेत चालकाच्या प्रसंगावधानाचे आणि प्राचार्य नागवडे यांच्या सतर्कतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# महापुरुषांच्या पुतळ्यांच्या कामांना गती; मनपा अधिकारी व लोकप्रतिनिधींकडून पाहणी



**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या मागणीनुसार मंजूर केलेल्या निधीतून शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांच्या उभारणी व सुशोभीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांना गती देण्यासाठी महापालिका अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी विविध ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली.

यामध्ये टीव्ही सेंटर येथील छत्रपती संभाजी महाराज, भडकल गेट येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांच्या कामांचा समावेश आहे. पाहणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना कामे दर्जेदार व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, मनपा आयुक्त अमोल येडगे, सभापती अनिल मकरीये, विरोधी पक्षनेते समीर बिल्डर, नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल, राजगौरव वानखेडे, महेश माळवतकर, राहुलकुमार सोनवणे, मुकेश जैन आदी उपस्थित होते.

# स्मार्ट मीटर सक्तीने बसविल्यास राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तीव्र आंदोलन : शशिकांत शिंदे



**हिंगोली :** जिल्ह्यात वीज ग्राहकांवर स्मार्ट मीटर सक्तीने लादण्याचा प्रयत्न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने महावितरण कंपनीविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री शशिकांत शिंदे यांनी दिला. दि. १६ जुलै २०२६ रोजी शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महावितरणचे हिंगोली जिल्हा अधीक्षक अभियंता श्री. चव्हाण यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

या शिष्टमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी सहकार मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, प्रदेश सरचिटणीस डॉ. भीमराव हातीअंभिरे, जिल्हा निरीक्षक पंकज बोराड, जिल्हा उपाध्यक्ष ॲड. रवि शिंदे, विधानसभा अध्यक्ष बंडू मुटकुळे, गणेशराव गडदे, मनीषा आखरे, माधव कोरडे, मोईन बागवान, बाबुराव दळवी, डॉ. वेदांत मरळे, सोनू चव्हाण, रमेश जाधव, राजू बाभळे, प्रफुल पाईकराव, प्रभू शिंदे, सिराज कुरेशी, राजाराम पोटे, सुनील मस्के, सुभाष सरडे, उत्तमराव पोटे, रमेश ढबाले, सुभाष सापनार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनामध्ये हिंगोली जिल्ह्यातील वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर सक्तीने बसवू नयेत, विद्यमान पोस्टपेड मीटर कायम ठेवावेत, स्मार्ट मीटरचे मॉडेल, उत्पादक कंपनी, BIS/CEA मान्यता, अचूकता चाचणी (Accuracy Test), कॅलिब्रेशन अहवाल, ग्राहकांच्या डेटाची सुरक्षितता, गोपनीयता, सायबर सुरक्षा, रिमोट डिस्कनेक्शनचे नियम, मीटर बिघाड झाल्यास तक्रार निवारण व भरपाईची प्रक्रिया तसेच स्मार्ट मीटर बंधनकारक असल्यास त्यासंबंधीचा कायदा, शासन निर्णय किंवा MERC आदेश यांची माहिती ग्राहकांना देण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय, हिंगोली जिल्ह्यात महावितरणच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून पीडित कुटुंबाला १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच बंद पडलेल्या व चोरी गेलेल्या डीपींच्या प्रश्नावर तातडीने कारवाई करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

# 'विश्वासाची परतफेड' : महिनाभरात शोधून दिले 130 हरवलेले मोबाईल

## अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू, पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते वितरण

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**



**छत्रपती संभाजीनगर :** आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या जोरावर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी अवघ्या महिनाभरात 130 हरवलेले मोबाईल शोधून काढत तब्बल 22 लाख 73 हजार 972 रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकांच्या स्वाधीन केला. 'विश्वासाची परतफेड' या उपक्रमांतर्गत कैलासशिल्प सभागृहात आयोजित कार्यक्रमात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते मोबाईलचे वितरण करण्यात आले.

दि. 13 जून ते 17 जुलै 2026 या कालावधीत ग्रामीण पोलिसांनी IMEI ट्रॅकिंग, CEIR (सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर) प्रणाली, सायबर विश्लेषण आणि विविध जिल्ह्यांतील पोलीस यंत्रणांशी समन्वय साधून ही उल्लेखनीय कामगिरी केली. शोधून काढलेल्या मोबाईलमध्ये ॲपल, ओपो, विवो, सॅमसंग, रिअलमी, रेडमीसह विविध कंपन्यांच्या मोबाईलचा समावेश आहे.

यावेळी पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नागरिकांची हरवलेली मालमत्ता परत मिळवून देणे ही लोकाभिमुख आणि उत्तरदायी पोलीसिंगची ओळख असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनीही हा उपक्रम नागरिककेंद्रित प्रशासनाचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगत ग्रामीण पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले.पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी मोबाईल हरवल्यानंतर नागरिकांनी तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून CEIR पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन केले. IMEI क्रमांकाच्या आधारे मोबाईल राष्ट्रीय स्तरावर ब्लॉक करून त्याचा मागोवा घेणे शक्य होत असल्याने गैरवापर रोखण्यास मोठी मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमातील सर्वाधिक भावनिक क्षण म्हणजे हरवलेला मोबाईल पुन्हा हातात घेतानाचा होता. मोबाईलमधील कुटुंबीयांचे संपर्क, छायाचित्रे, महत्त्वाची कागदपत्रे आणि वैयक्तिक माहिती सुरक्षितपणे परत मिळाल्याने अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. अनेकांनी ग्रामीण पोलिसांचे आभार मानत हा केवळ मोबाईल परत मिळाल्याचा नाही, तर पोलीस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ करणारा अनुभव असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांनी केले. यावेळी जिल्हाभरातून 200 हून अधिक नागरिक उपस्थित होते.

# शिवना परिसरातील मिरची पिकावर ..

पान 1 वरून ->

पाणी फिरले आहे. अनेक दिवसांपासून समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतात वरचे पाणी पोहोचत नाही. नाले, तलाव आणि इतर जलस्रोतांतील पाणीसाठाही कमी झाला असून अनेक बोअरवेलची पाणीपातळी खालावली आहे. त्यामुळे वेळेवर सिंचन करणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. पावसाअभावी मिरचीची झाडे कमकुवत होत असतानाच पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे कोकडा रोग वेगाने पसरत आहे. या रोगामुळे पानांची आकसण, नवीन फुटवे न येणे, फुले व फळगळ होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेक शेतांमध्ये पिकाचे मोठे नुकसान होत असून यंदा उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकरी महागडी कीटकनाशके व औषधांची वारंवार फवारणी करत आहेत. मात्र, अपेक्षित परिणाम मिळत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. खत, औषधे, मजुरी आणि सिंचनावर मोठा खर्च करूनही पीक वाचवणे कठीण होत असल्याने आर्थिक संकट अधिक गडद होत आहे. शेतकऱ्यांनी कृषी विभाग व प्रशासनाकडे शिवना परिसरातील मिरची पिकाचे तातडीने सर्वेक्षण करण्याची, कृषी तज्ज्ञांचे पथक पाठवून योग्य तांत्रिक मार्गदर्शन देण्याची, सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्याची तसेच बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. वेळेत चांगला पाऊस न झाल्यास यंदाच्या मिरची उत्पादनावर गंभीर परिणाम होईल, अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत खडकेश्वर परिसरात स्वच्छता व वृक्षारोपण अभियान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत खडकेश्वर परिसरात स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपणाचा समाजोपयोगी उपक्रम उत्साहात पार पडला. स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनाखाली आयोजित या अभियानातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमात श्री खडकेश्वर महादेव मंदिर परिसर तसेच महापुरुषांच्या पुतळ्यांच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. परिसरातील कचरा हटवून स्वच्छ वातावरण निर्माण करण्यात आले. यानंतर विविध ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरणाचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. शहर अधिक स्वच्छ, हरित आणि सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनीही अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत शहरात विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, सामाजिक



जबाबदारी आणि जनजागृती यांना चालना देण्याचा या उपक्रमांचा उद्देश आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ होण्यास मदत होत असून, शहराच्या सर्वांगीण विकासालाही त्याचा हातभार लागणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, महापौर समीर राजूरकर, नगरसेविका अमृता पालोदकर, कीर्ती शिंदे, सीमा साळवे, मंडळ अध्यक्ष महेश मल्लेकर, महिला मोर्चा अध्यक्षा उज्ज्वला दहिफळे, तसेच बबन नरवडे, कचरू घोडके, सिद्धार्थ साळवे, अमित लोखंडे, वंदना शहा, श्रीधर बक्षी, मुकेश जाधव, उदय मुळे, उमेश राठी, धनश्री रोंघे, अपर्णा चौबे, रुपाली सुतार, सुभाष कवडे, शुभम राजपूत, यश तोतला, हर्षदा राजपूत, हर्ष चावडा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विशेष पुनरीक्षण मोहिमेला सावंगी म्हाळसात खीळ

# वॉर्ड 51 मध्ये 15 जुलैपर्यंत बीएलओच पोहोचले नाहीत; ग्रामस्थांचा संताप

**जिंतूर, प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेंतर्गत घराघरांत जाऊन मतदारांची माहिती अद्ययावत करण्याचे काम सुरू असताना, जिंतूर तालुक्यातील सावंगी म्हाळसा येथील वॉर्ड क्रमांक ५१ मध्ये १५ जुलैपर्यंत बीएलओ पोहोचले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती, मयत मतदारांची नावे वगळणे आणि नवीन मतदारांची नोंदणी यासाठी बीएलओमार्फत 'एन्युमरेशन फॉर्म' भरून घेण्याचे निर्देश असतानाही संबंधित वॉर्डात काम सुरू झाले नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

यामुळे मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता असून, निवडणूक प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित प्रकरणाची चौकशी करावी व वॉर्डात बीएलओची नियुक्ती करून काम सुरू करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# करंजगावात गरजूंना काठी, चप्पल व छत्रीचे वाटप




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**करंजगाव :** एच. जी. फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत करंजगाव येथे गरजू नागरिक, ज्येष्ठ नागरिक व महिलांना चालण्याच्या काठ्या, चप्पल आणि छत्रीचे मोफत वाटप करण्यात आले. दैनंदिन जीवनात आवश्यक वस्तू उपलब्ध करून गरजूंना आधार देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी सरपंच सतीश रावते, ग्रामसेवक राजपूत, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र मोकळे, मनोज शेळके, सतीश मगर, अनिल गायकवाड, दीपक कोळशे तसेच आशा सेविका रशिदाताई व कृष्णा सरोवर यांची प्रमुख उपस्थिती होती. मोठ्या संख्येने लाभार्थी, ज्येष्ठ नागरिक व महिला कार्यक्रमास उपस्थित होत्या.

# पारंपरिक सात फळ पिकांसोबतच हळदीला विम्याचे सुरक्षाचक्र

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**गेल्या काही वर्षात मराठवाड्यातील नांदेड. परभणी. हिंगोली या तीनही जिल्ह्यांमध्ये हळदीची लागवड मोठ्या प्रमाणात होत आहे. मराठवाड्यात बागायत क्षेत्राखाली नगदी पीक म्हणून उसाचे पीक घेतले जात असले तरी गेल्या काही वर्षात हळदी लागवड मोठ्या प्रमाणात वाढले आहे. उसाच्या तुलनेत कमी पाणी. कमी मशागत खर्च लागत असल्याने गेल्या काही वर्षात शेतकरी नगदी पीक म्हणून हळदीला पसंती देत आहेत. पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेत खरीप मृग बहार साठी यंदा प्रथमच हळद या पिकांचाही समावेश करण्यात आला आहे ही बाब उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आहे. या योजनेत संत्रा. मोसंबी. लिंबू. डाळिंब. पेरू. चिक्कू आणि सीताफळ या पारंपरिक सात फळ पिकांसोबतच यंदा पहिल्यांदाच हळद पिकाचाही समावेश झाला आहे. हळद फळपिकासाठी.9. हजार रुपये विमा हप्ता असून विमा सुरक्षित रक्कम.1. लाख 80 हजार रुपये आहे या योजनेत सहभागी होण्यासाठी दि.14. अंतिम मुदत देण्यात आली होती त्यानुसार अनेक शेतकऱ्यांनी या प्रक्रियेत सहभाग नोंदवला आहे.

राज्यातल्या 15 जिल्ह्यातील सुमारे 404 महसूल मंडळातल्या हळद उत्पादक शेतकऱ्यांना या विमा योजनेचा लाभ घेता येणार आहे. या जिल्ह्यामध्ये मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर. परभणी. हिंगोली. नांदेड. धाराशिव. जालना या जिल्ह्यांसह. वाशिम. यवतमाळ. बुलढाणा. अकोला. चंद्रपूर. सांगली. सातारा. वर्धा. जळगाव या 15 जिल्ह्यांचा समावेश आहे अवेळी पाऊस. पावसातला खंड. असमाधानकारक पाऊस जास्त तापमान या चार जोखमीच्या आधारे विम्याची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना दिला जाणार आहे.

# नीट परीक्षेत 582 गुण मिळवत कु. जान्हवी दिनकर कोकरे हिचे घवघवीत यश



हिंगोली ;- कळमनुरी तालुक्यातील बहुर येथील भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष दिनकरराव कोकरे यांची कन्या कु. जान्हवी कोकरे हिने राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET) मध्ये 582 गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे तिने वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा यशस्वीरित्या पार केला आहे.

ग्रामीण भागातून कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर मिळविलेल्या या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे. तिच्या या यशामागे आई-वडिलांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची मेहनत यांचा मोठा वाटा असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

कु. जान्हवी कोकरे हिच्या या यशामुळे बहुर गावासह संपूर्ण कळमनुरी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, इतर विद्यार्थ्यांसाठीही ती प्रेरणादायी ठरली आहे. तिच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक व नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड



**जिंतूर प्रतिनिधी :** पत्रकारांच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी कार्यरत असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड शुक्रवारी (दि. १७) सर्वानुमते करण्यात आली. संघटनेच्या बैठकीत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी सचिन रायपत्रीवार, तर सचिवपदी दिलीप देवकर यांची निवड करण्यात आली. तसेच माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची जिल्हा संघटकपदी निवड झाल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचा गौरव केला. ही बैठक व्हाईस ऑफ मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर, जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख, साप्ताहिक विंगचे प्रदेश उपाध्यक्ष नेमिनाथ जैन, माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, आनंदकुमार मुरक्या, रंगनाथ गडदे, प्रभाकर कुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेसाठी सोयगाव पोलिसांची जनजागृती मोहीम; जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१७ जुलै :** जिल्हा परिषद प्रशाला सोयगांव येथे नशामुक्ती व बालविवाह प्रतिबंध जनजागृती अभियान अंतर्गत पंधरवाड्याच्या निमित्ताने सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिनकर गोरे यांचे अमली पदार्थ विरुद्ध नशामुक्ती व बालविवाह प्रतिबंधात्मक विशेष मार्गदर्शन जनजागृती वर विशेष मार्गदर्शन पार पडले.शुक्रवार सकाळी १०.३० वाजता नशा मुक्ती जनजागृती अभियान व बालविवाह मुक्ती व्याख्याना दरम्यान वरील विशेष निमंत्रित यांनी मुलांचे मार्गदर्शन केले.प्रत्यक्ष कृती वजा अभिनय करुन मुलांना हसतखेळत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला



अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड उपस्थित होते. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी बालविवाह व अंमली पदार्थ सेवन व तंबाखू सेवन यांचे दुष्परिणाम विद्यार्थी यांना काका दीदी पथक यांनी गुड टच - बॅड टच,महिला विषयीचे कायदे,डायल 112,मोबाईलसोशल मीडिया अतिवापर परिणाम,सायबर गुन्हे,अमली पदार्थांचे दुष्परिणाम,मुला मुलींचे लहान वयात पळून जाण्याचे दुष्परिणाम,बालविवाह याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. व तसेच विविध विषयांवर मार्गदर्शन केले. आपल्या परिसरातील व्यक्तींना व आपण स्वतः व्यसनांपासून दूर कसे राहावे याबाबत कृषिभूषण अरुण सोहणी यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केले व्यसनाधीनतेमुळे कुटुंबावर होणारा परिणाम यांचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोयगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे व पोलीस कर्मचारी सादिक तडवी, प्रियंका बोडखे,माधुरी लोखंडे,कृषिभूषण अरुण सोहनी यांचा फुल गुच्छ देऊन सत्कार जिल्हा परिषद प्रशाला सोयगावचे मुख्याध्यापक दादाराव राठोड यांनी केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर चौधरी यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दौलतसिंग परदेशी केले.याप्रसंगी जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव शाळेचे शिवाजी नवले,संगीता सोनवणे,विद्याधर बागूल,राजेंद्र उंबरकर,तुकाराम पायघन,सचिन ढगे,शिवराम आगे,केंद्र शाळेचे मंगलताई बोरसे,विवेक महाजन यांचेसह प्रशालेचे व केंद्र शाळा सोयगाव सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# गुजरात इंजेक्टची आर्थिक झेप; उत्पन्नात 414%, नफ्यात 1,600% वाढ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील गुजरात इंजेक्ट (केरळ) लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत उल्लेखनीय आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीच्या ऑपरेशनल उत्पन्नात ४१४ टक्के, तर करानंतरच्या निव्वळ नफ्यात तब्बल १,६०० टक्क्यांची वाढ झाली आहे. मंगळवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे अनऑडिटेड आर्थिक निकाल मंजूर करण्यात आले. एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत कंपनीचे ऑपरेशनल उत्पन्न २.४२ कोटी रुपयांवरून १२.४५ कोटी रुपयांवर पोहोचले. याच कालावधीत निव्वळ नफा ७.३५ लाख रुपयांवरून १.२५ कोटी रुपयांवर गेला, तर प्रति शेअर उत्पन्न (EPS) ०.०५ रुपयांवरून ०.८६ रुपये झाले. कंपनीने आपले नाव बदलून रेजेनोव्हा रिन्युटेक लिमिटेड करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी दिली असून, स्वच्छ ऊर्जा व्यवसायातील विस्ताराचे हे प्रतीक मानले जात आहे. तसेच मुरली शिवशंकरण नायर यांची तीन वर्षांसाठी व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) पद रिक्त; हजारो शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कामकाज ठप्प

## हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

हिंगोली | वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) हे अत्यंत महत्त्वाचे पद गेल्या काही काळापासून रिक्त असल्याने जिल्ह्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या वेतन अनुदानाशी संबंधित कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे. विविध प्रस्ताव, प्रशासकीय मंजुरी, सेवा विषयक प्रकरणे, वेतनवाढीची कार्यवाही तसेच आर्थिक मंजुरीची अनेक कामे प्रलंबित राहिल्यामुळे हजारो शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थाचालक व शाळांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

वेतन पथक अधीक्षक हे पद आहरण व संवितरण अधिकारी (DDO) तसेच कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असल्याने त्याचे




महत्त्व अधिक आहे. विशेषतः जुलै महिन्यात वार्षिक वेतनवाढ, सेवा विषयक मंजुरी आणि इतर आर्थिक बाबींवरील अंतिम स्वाक्षरी या पदाधिकाऱ्यांकडून होणे आवश्यक असते. मात्र पद रिक्त असल्यामुळे सर्व कामांमध्ये अनावश्यक विलंब होत असून त्याचा थेट परिणाम हजारो कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांवर होत आहे.

तत्कालीन वेतन पथक अधीक्षक राम लांडे यांना ३० जून २०२६ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. त्यानंतर तत्काळ कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला नसल्याने कार्यालयाचे दैनंदिन कामकाज, प्रशासकीय निर्णयप्रक्रिया आणि आर्थिक मंजुरीची कार्यवाही ठप्प झाली आहे.

या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेच्या वतीने माध्यमिक शिक्षणाधिकारी विपुन भागवत यांना निवेदन देऊन वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) पदावर तातडीने नियमित नियुक्ती करावी किंवा तत्पूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनायक, जिल्हा उपाध्यक्ष संतोष गंगावणे, वसमत तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, पांडुरंग भोयर, शेख अली, आकाश बांगर, गजानन वडकुते, कुंडलिक पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी विपुन भागवत यांनी संबंधित वेतन पथक अधीक्षक पद तातडीने भरण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व संस्थाचालकांनी प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन पर्यायी व्यवस्था करावी व नियमित नियुक्तीची प्रक्रिया लवकर पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रलंबित कामांना गती मिळून जिल्ह्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# घरबसल्या परिवहन विभागाच्या 58 फेसलेस सेवांचा लाभ घ्या

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** परिवहन विभागामार्फत वाहन परवाना (लायसन्स) व वाहन नोंदणीसंबंधी सेवा अधिक पारदर्शक, सुलभ आणि कालबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी 'सारथी 4.0' आणि 'वाहन 4.0' या ऑनलाइन संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या प्रणालीद्वारे नागरिकांना घरबसल्या विविध सेवांसाठी अर्ज करता येत असून, त्यापैकी 58 सेवा फेसलेस पद्धतीने उपलब्ध असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिली आहे.

पूर्वी वाहन व अनुज्ञप्ती संदर्भातील अर्ज प्रत्यक्ष कार्यालयात येऊन सादर करावे लागत होते. त्यामुळे काही वेळा अनधिकृत व्यक्ती किंवा मध्यस्थांकडून नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता होती. मात्र, केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार विकसित करण्यात आलेल्या ऑनलाइन प्रणालीमुळे नागरिकांना आधार क्रमांक व त्यास संलग्न मोबाईल क्रमांकाच्या आधारे कार्यालयात न जाता घरबसल्या अर्ज करता येत आहेत. कार्यालयामार्फत अर्जांची ऑनलाइन पडताळणी करून मंजुरी अथवा नामंजुरीची कार्यवाही नियमितपणे केली जाते.

परिवहन विभागाच्या एकूण 115 अधिसूचित सेवांपैकी 89 सेवा ऑनलाइन उपलब्ध असून, अनुज्ञप्तीसंदर्भातील सेवा सारथी पोर्टलवर, तर वाहनसंबंधी सेवा वाहन पोर्टलवर दिल्या जातात. यापैकी 58 सेवा पूर्णपणे फेसलेस स्वरूपात उपलब्ध आहेत.

नागरिकांनी ऑनलाइन अर्ज करताना पोर्टलवर नमूद केलेले शासकीय शुल्क व कर इतकीच रक्कम ऑनलाइन भरावी. कोणत्याही अनधिकृत व्यक्ती किंवा मध्यस्थाला अतिरिक्त शुल्क देऊ नये. अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्यास तत्काळ प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी येथे अनधिकृत व्यक्तींच्या प्रवेशास प्रतिबंध करण्यात आला असून, नागरिकांच्या वाहन व अनुज्ञप्तीसंबंधी अडचणी सोडविण्यासाठी माहिती व मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. नागरिकांनी उपलब्ध 58 फेसलेस सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# दुहेरीकरणाबाबत रेल्वे प्रशासनाने योग्य समन्वयातून मार्ग काढावा : जिल्हाधिकारी- संजय सिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** परभणी–परळी रेल्वेमार्ग दुहेरीकरण प्रकल्पाअंतर्गत भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात शेतकऱ्यांच्या हरकती, जमिनीचे मूल्यनिर्धारण, जनसुनावणी तसेच इतर प्रलंबित बाबींचा संवेदनशीलतेने विचार करून रेल्वे प्रशासनाने योग्य समन्वयातून मार्ग काढावा, असे निर्देश जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात परभणी–परळी रेल्वेमार्ग दुहेरीकरण प्रकल्पासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी शोभा जाधव, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, उपमुख्य अभियंता (निर्माण) छत्रपती संभाजीनगर-2 सुजीतकुमार, सीनिअर सेक्शन इंजिनिअर जे.पी मीना, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जीवराज डापकर, शैलेश लाहोटी, संगीता चव्हाण, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अनिता भालेराव, रेल्वे प्रशासनाचे अधिकारी तसेच संबंधित शेतकरी उपस्थित होते.

बैठकीत शेतकऱ्यांनी भूसंपादन प्रक्रियेसंदर्भातील विविध आक्षेप, जमिनीच्या मूल्यनिर्धारणाबाबतच्या अपेक्षा, जनसुनावणीतील मुद्दे तसेच इतर अडचणी मांडल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी या मुद्द्यांची नोंद घेऊन त्यावर सविस्तर चर्चा केली.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आवश्यक असून, शेतकऱ्यांच्या भावना व अडचणी समजून घेऊन रेल्वे प्रशासनाने त्यांच्याशी सातत्याने संवाद साधावा. भूसंपादनाबाबत असलेल्या शंका, गैरसमज व आक्षेप दूर करून आवश्यक माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करून द्यावी. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण होऊन भूसंपादन प्रक्रियेस सकारात्मक वातावरण तयार होण्यास मदत होईल.

तसेच, जनसुनावणीत मांडण्यात आलेल्या मुद्द्यांवर नियमानुसार कार्यवाही करून प्रकल्पाशी संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, जेणेकरून दुहेरीकरण प्रकल्पाची अंमलबजावणी विनाविलंब आणि सुरळीतपणे होईल, असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

# डॉ.प्रमोद पवार यांना राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार 2026 प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१७ जुलै :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील इंग्रजी विभागाचे सहयोगी प्राध्यापक,विभागप्रमुख, संशोधन मार्गदर्शक तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) संचालक डॉ.प्रमोद आंबादासराव पवार यांना शिक्षण, संशोधन, मूल्याधिष्ठित अध्यापन,शैक्षणिक नेतृत्व आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दि.१२ जुलै २०२६ रोजी पुणे,महाराष्ट्र येथे आयोजित विशेष समारंभात SwiftNLift संस्थेतर्फे प्रदान करण्यात आला.शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य, नाविन्यपूर्ण अध्यापन,शैक्षणिक गुणवत्ता आणि राष्ट्रनिर्मितीतील मोलाच्या योगदानाची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रमाणपत्रात डॉ. पवार यांचा "21st-Century Global Literary Critic" असा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे.

डॉ.पवार यांनी इंग्रजी भाषा व साहित्य, संशोधन,संशोधन मार्गदर्शन,शैक्षणिक लेखन



आणि गुणवत्ता वृद्धी उपक्रमांद्वारे उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. असून त्यांच्या शैक्षणिक योगदानाची विविध स्तरांवर दखल घेतली जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव चे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.आर.के. बारोटे,संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ.पवार यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक लौकिकात आणखी भर पडेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ.प्रमोद आंबादासराव पवार यांनी हा सन्मान आपल्या विद्यार्थ्यांना,सहकारी प्राध्यापकांना, कुटुंबीयांना आणि हितचिंतकांना समर्पित करत उच्च शिक्षण,संशोधन,नाविन्यपूर्ण विचार आणि राष्ट्रनिर्मितीसाठी भविष्यातही अधिक जोमाने कार्यरत राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

डॉ.पवार यांच्या या राष्ट्रीय सन्मानामुळे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव तसेच संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# खुलताबाद येथील जर जरी बक्ष यांच्या 740 व्या उरूसाची जय्यत तयारी; जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नियोजनाचा आढावा




दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजी नगर :** जिल्हा प्रतिनिधी येत्या १७ ऑगस्टपासून खुलताबाद येथे हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी बक्ष (रह.) यांच्या ७४० व्या उरूस यात्रेला प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी (ता. १७) जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली उरूसाच्या पूर्वतयारीसंदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

यात्रेसाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयी-सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि विविध विभागांच्या समन्वयाचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. बैठकीच्या प्रारंभी उरूस व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन यांनी उरूस यात्रेदरम्यान आवश्यक असलेल्या विविध सुविधांबाबत प्रस्ताव मांडले. भाविकांसाठी वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, वाहनतळ, वीजपुरवठा तसेच इतर मूलभूत सुविधांचे नियोजन प्रभावीपणे करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी उरूसासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले. आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, अखंडित वीजपुरवठा, स्वच्छतागृहे, एसटी बस सेवा, वाहतूक व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

उरूसासाठी आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करण्याबरोबरच सार्वजनिक सुविधांवर विशेष भर देण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यात्रेदरम्यान स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्थेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, अशी सूचनाही त्यांनी केली

उरूस काळात वाहनतळ, राहटपाळणे तसेच इतर मनोरंजनाच्या साधनांमुळे गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन नियोजनबद्ध व्यवस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था, आपत्कालीन यंत्रणा आणि आवश्यक मनुष्यबळ सज्ज ठेवण्यावरही भर देण्यात आला.

यंदा ७४० वा उरूस आणि श्रावण महिना एकाच कालावधीत येत असल्याने खुलताबादमध्ये वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचे प्रभावी नियोजन करावे, तसेच शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवून सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यात्रा काळात आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, महावितरण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, तहसील कार्यालय आणि खुलताबाद नगरपालिका यांनी परस्पर समन्वयाने काम करून यात्रा सुरक्षित, सुरळीत आणि शिस्तबद्ध पार पाडावी, जेणेकरून भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, उरूस व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार संतोष गुट्टे, मुख्याधिकारी तथा समितीचे सचिव समीर शेख, नगराध्यक्ष सय्यद आमेर पटेल, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, दरगाह कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, उपाध्यक्ष इमरान जहांगीरदार, सचिव मोहम्मद मतीन, सदस्य सचिव कामरान अहमद तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस दरगाह कमिटीचे सदस्य तथा माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन,

# शेवा येथे घराचा स्लॅब कोसळून तिघे गंभीर; प्रशासननिर्मित दुर्घटना' असा ग्रामस्थांचा आरोप




हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** उरण तालुक्यातील मौजे नवीन शेवा येथे एका घराचा स्लॅब अचानक कोसळून तीन जण गंभीर जखमी झाल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने केवळ एका कुटुंबावर संकट कोसळले नसून, गेल्या चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसन प्रश्नावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. ही केवळ अपघाती घटना नसून, प्रशासनाच्या दीर्घकालीन दुर्लक्षाची आणि निष्क्रियतेची परिणती आहे, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

जेएनपीटी (JNPT) प्रकल्पासाठी नवीन शेवा येथील भूमिपुत्रांनी विकासाच्या नावाखाली आपल्या जमिनी शासनाला दिल्या. त्याबदल्यात सुरक्षित पुनर्वसन आणि कायमस्वरूपी निवासाची हमी मिळणे अपेक्षित होते. मात्र, ४० वर्षांनंतरही पुनर्वसनाचा प्रश्न धुळखात पडलेला असून, अनेक कुटुंबे आजही जीव मुठीत धरून मोडकळीस आलेल्या घरांमध्ये राहण्यास भाग पडली आहेत, अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, तात्पुरत्या स्वरूपात दिलेल्या जागांवर पक्की घरे उभारण्यास परवानगी नाही. परिणामी, चार दशकांपूर्वी उभारलेली घरे आज जीर्ण, धोकादायक आणि वाळवीग्रस्त झाली आहेत. अनेक वेळा प्रशासनाला या धोक्याची जाणीव करून देऊनही ठोस उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पुनर्वसनाची जमीन अद्याप संबंधितांच्या नावावर करण्यात आलेली नसल्याने सातबारा उताऱ्यावर हक्क मिळालेला नाही. त्यामुळे घरांच्या दुरुस्तीसाठी किंवा नवीन घर उभारण्यासाठी बँकांकडे कर्ज मागितल्यास "जमीन नावावर नाही" या कारणावरून कर्ज नाकारले जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना स्वतःच्या घराच्या सुरक्षेसाठीही आर्थिक मदत मिळत नसल्याची शोकांतिका निर्माण झाली आहे.

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, वारंवार निवेदने, अर्ज, पाठपुरावा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनांनंतरही तहसील कार्यालयाकडून प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रभावी कार्यवाही करण्यात आली नाही. वेळेत पुनर्वसन पूर्ण झाले असते किंवा जमिनींची नोंद संबंधितांच्या नावावर झाली असती, तर संबंधित कुटुंबाला कर्ज मिळून सुरक्षित घर उभारणे शक्य झाले असते आणि ही दुर्घटना टाळता आली असती, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

# एमबीबीएस विद्यार्थ्यांना परीक्षा तयारीचे तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

## एनएमसी-सीबीएमई अभ्यासक्रमांतर्गत शरीररचनाशास्त्र विभागाचा उपक्रम



**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील शरीररचनाशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (NMC) Competency-Based Medical Education (CBME) अभ्यासक्रमांतर्गत प्रथम वर्ष एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी विशेष अतिथी व्याख्यान व परीक्षा मार्गदर्शन सत्राचे आयोजन बजाज संकुलात करण्यात आले.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव येथील शरीररचनाशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अब्दुल राफे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना एमयूएचएसच्या वार्षिक परीक्षेची तयारी, वेळेचे नियोजन, उत्तरलेखनाची प्रभावी पद्धत आणि अभ्यासतंत्र याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. ग्रॉस ॲनाटॉमी, हिस्टोलॉजी, एम्ब्रायोलॉजी, जेनेटिक्स आणि क्लिनिकल ॲनाटॉमी या विषयांचे परीक्षेतील महत्त्व स्पष्ट करत त्यांनी विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर सक्षम व रुग्णकेंद्रित वैद्यकीय व्यावसायिक होण्याच्या दृष्टीने अभ्यास करावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमात विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर यांनी अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षणाला चालना मिळत असल्याचे सांगितले. यावेळी सहयोगी प्राध्यापक डॉ. कल्पना पाटील, डॉ. हिजाब अख्तर तसेच सहाय्यक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण व डॉ. वैशाली किरवले उपस्थित होत्या. प्रथम वर्ष एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांनी शंभर टक्के उपस्थिती लावत या मार्गदर्शन सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# घोटाळे, एजंटराज अन् हलगर्जीपणावर जि.प. प्रशासनाची कोंडी

## सोलर प्रकल्पातील 18 कोटींच्या कथित गैरव्यवहाराचा स्फोट; 2019 पासून गैरहजर शिक्षकावर कारवाईचे आदेश



**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेची गुरुवारी झालेली स्थायी समितीची बैठक ही केवळ नियमित कामकाजाची बैठक न ठरता प्रशासनाच्या कारभाराचा जाहीर लेखाजोखा ठरली. प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील सोलर प्रकल्पातील कथित १८ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारापासून योजनांतील एजंटराज, २०१९ पासून विनापरवानगी गैरहजर असलेल्या शिक्षकाचे प्रकरण, शाळांतील शिक्षकांची कमतरता आणि जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) निधीच्या वाटपावरील वाद अशा एकापाठोपाठ एक गंभीर मुद्द्यांवर सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी चौकशी, कारणे दाखवा नोटिसा आणि कठोर कारवाईचे आदेश देत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला.

बैठकीत सर्वाधिक गाजला तो आरोग्य विभागातील सोलर प्रकल्पाचा मुद्दा. सदस्य पंकज ठोंबरे यांनी १५ हून अधिक प्राथमिक आरोग्य केंद्रांवर सोलर यंत्रणा प्रत्यक्षात कार्यान्वित नसतानाही कंत्राटदारांना तब्बल ८० टक्के बिले अदा केल्याचा गंभीर आरोप केला. उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनी आळंद प्राथमिक आरोग्य केंद्रात सोलरचे साहित्य महिनोनमहिने धूळ खात पडल्याचे निदर्शनास आणत संबंधित एजन्सी आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली. अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींना पाठीशी घालणार नाही, असा इशारा दिला.

शिक्षण विभागाचाही बैठकीत खरपूस समाचार घेण्यात आला. कन्नड तालुक्यातील पांगरा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक भगवान बोराडे हे २०१९ पासून सातत्याने गैरहजर राहत असल्याचा मुद्दा सदस्य दीपाली राजपूत यांनी उपस्थित केला. यावर सीईओंनी संबंधित केंद्रप्रमुखांचे वेतन रोखण्याचे तसेच गटशिक्षणाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून तातडीने जिल्हा परिषदेत हजर राहण्याचे आदेश दिले. शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे अनेक गावांत लोकवर्गणीतून खासगी शिक्षक ठेवण्याची वेळ आल्याचेही सदस्यांनी सांगितले.

बैठकीत विविध शासकीय योजनांमध्ये एजंटांच्या माध्यमातूनच लाभार्थ्यांच्या फाईली मंजूर होत असल्याचा आरोप सदस्य संजय निकम यांनी करत "सीईओ मॅडम, तुम्ही तुकाराम मुंडे व्हा," अशी मागणी केली. त्यावर मिन्नू पी.एम. यांनी प्रशासनात शिस्त आणण्यासाठी कठोर पावले उचलत असल्याचे स्पष्ट केले. अध्यक्ष गलांडे यांनीही पैसे मागणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात पुरावे द्या, संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले.

दरम्यान, डीपीसी निधीपैकी ४० टक्के निधी आमदारांसाठी राखून ठेवण्याच्या चर्चेलाही सदस्यांनी तीव्र विरोध दर्शविला. "जिल्हा परिषद सदस्यांच्या विकास निधीवर कुठलाही गदा येऊ देणार नाही," अशी ठाम भूमिका अध्यक्ष गलांडे यांनी मांडली. एकूणच, स्थायी समितीची ही बैठक प्रशासनाला धारेवर धरणारी आणि कारवाईच्या इशाऱ्यांनी गाजलेली ठरली.

# जिंतूर येथे भाजपा परभणी जिल्हा कार्यकारणी बैठक संपन्न





**जिंतूर:-** शहरातील लक्ष्मी फंक्शन हॉलमध्ये जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली परभणी जिल्हा भारतीय जनता पार्टीची महत्त्वपूर्ण जिल्हास्तरीय बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या बैठकीस राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.मेघनादीदी साकोरे बोर्डीकर, मा. आ. संजयजी केनेकर, मा. आ. रामप्रसादजी बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच जिल्हाभरातील पदाधिकारी, मोर्चा अध्यक्ष, मंडळ अध्यक्ष व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती असल्यानं पुन्हा एकदा जिल्ह्यातील भाजपा परिवार एकत्र आला.

“परभणी जिल्ह्यातील प्रत्येक उपक्रम हा केवळ कार्यक्रम न राहता जनतेपर्यंत पक्षाची विचारधारा, आपली विकासाची भूमिका पोहोचवणारं प्रभावी जनआंदोलन ठरलं पाहिजे व छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान, मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येणारे रक्तदान शिबिर, अनेक संघटनात्मक उपक्रम जिल्ह्यातील प्रत्येक मंडळात यशस्वीरित्या राबविण्यासाठी आतापासूनच सज्ज व्हा,” असं आवाहन जिल्हाभरातील पदाधिकाऱ्यांना पालकमंत्री ना.मेघना बोर्डीकर यांनी केले.

मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या बाबतीत विरोधकांच्या सध्या सुरू असणाऱ्या टीकेचा यावेळी त्यांनी खरपूस समाचार घेतला!

यावेळी SIR संदर्भातही सविस्तर आढावा घेतला.

तसेच शेतकऱ्यांची देशातील सर्वात मोठी कर्जमाफी आणि उर्वरीत ४८ हजार कोटींची ऐतिहासिक वीजबिलमाफी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी करून दाखवली त्याबद्दल आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली.

“मतदार यादीची अचूकता, प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोच, बूथस्तरावरील संघटन सक्षम करणं, प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे. प्रत्येक बूथ मजबूत झाला तर आपणा सर्वांना शक्ती मिळेल,” असा विश्वास बोलून दाखवला.

संघटनात्मक विषयांवर सखोल चर्चा करत आगामी काळातील विविध कार्यक्रमांचे नियोजन यावेळी निश्चित केलं. परभणी जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचे संघटन गतिमान, सक्षम, जनाभिमुख करण्याचा दृढ संकल्प याप्रसंगी व्यक्त केला.

भाजपा जिल्हा सरचिटणीस डॉ. पंडितराव दराडे, ऋषिकेश सकनुर, आकाशराव लोहट, प्रसादराव खारकर, विठ्ठलराव रबदडे मामा, व्यंकटराव तांदळे, नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख, सर्व जिल्हा उपाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, जिल्हा मोर्चा अध्यक्ष, सर्व आजी/माजी पदाधिकारी, कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते.

# विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत परभणी जिल्ह्याची दमदार कामगिरी

## डिजिटायझेशनमध्ये विभागात परभणी जिल्हा प्रथम, राज्यात चौथा क्रमांक

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत परभणी जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. मतदार नोंदणी अर्जांच्या डिजिटायझेशनमध्ये परभणी जिल्ह्याने छत्रपती संभाजीनगर विभागात प्रथम, तर महाराष्ट्रात चौथा क्रमांक मिळविला आहे.

या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हानिहाय आढावा बैठक घेतली. यावेळी परभणी जिल्ह्याने अल्पावधीत साधलेल्या प्रगतीची विशेष दखल घेत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय सिंह चव्हाण यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच जिल्हा प्रशासन, उपविभागीय अधिकारी, मतदान नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, बीएलओ आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समन्वित प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले.

जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांमध्ये डिजिटायझेशनचे काम वेगाने सुरू असून गंगाखेड विधानसभा मतदारसंघाने ६६.५६ टक्के प्रगतीसह आघाडी घेतली आहे. त्यापाठोपाठ पाथरी (५९.३५ टक्के), जिंतूर (५४.४३ टक्के) आणि परभणी (४७.४२ टक्के) मतदारसंघांचा क्रमांक लागतो.

जिल्ह्यातील एकूण १५ लाख ४१ हजार ७ मतदारांपैकी ८ लाख ८४ हजार ८४३ मतदारांच्या अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून, एकूण प्रगती ५७.४२ टक्क्यांवर पोहोचली आहे.

जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी

# वीर वाजेकर फुंडेची अग्निवीर म्हणून निवड



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, महालण विभाग, फुंडे, ता. उरण येथील "रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमी" मधील विद्यार्थी अथर्व रवींद्र गाताडी यांची भारतीय नौसेनेत अग्निवीर पदावर निवड झाली आहे. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार रामशेठ ठाकूर, रायगड विभाग व महाविद्यालय विकास समिती चेअरमन बाळाराम पाटील,रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी. जे. पाटील , नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर, सुधीर घरत सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवक, माजी विद्यार्थी संघ तसेच प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर संचालक डॉ. चिंतामण धिंदळे आणि ,डॉ.संदीप घोडके,उपप्राचार्य व सर्व विद्यार्थ्यांनी अथर्व गाताडी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. रयत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रातून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी संरक्षण दलात सामील होण्यासाठी असेच परिश्रम घ्यावेत, असे आवाहन पदाधिकारी मान्यवरांनी केले आहे.या यशाबद्दल महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून विद्यार्थी, प्राध्यापक व माजी विद्यार्थ्यांकडून त्यांचे कौतुक होत आहे.अथर्व गाताडी यांनी रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीत घेतलेल्या मार्गदर्शन व प्रशिक्षणाच्या जोरावर नौसेना भरती प्रक्रियेतील शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा आणि वैद्यकीय चाचणी यशस्वीरीत्या पार करून अग्निवीर म्हणून निवड मिळवली. देशसेवेची संधी मिळाल्याने त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे. रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व संरक्षण दल भरतीचे मोफत मार्गदर्शन दिले जाते. अथर्व गाताडी यांच्या यशामुळे परिसरातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे.

# काँग्रेसच्या रायगड जिल्हा महिला आघाडीतर्फे अर्जुन पाटील यांना श्रद्धांजली

## पत्रकार कृष्णा पाटील परिवाराच्या सांत्वनासाठी पंचक्रोशीतील मान्यवरांची रिघ



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण रायगड :** उलवे नोडमधील मोरावे गावचे ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि वारकरी सांप्रदायाचा वारसा चालवणारे आणि भजन-कीर्तनात आयुष्य जगलेले अर्जुन भोकाजी पाटील यांचे ९ जुलै रोजी निधन झाले. ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील यांचे ते वडील होत. त्यामुळे दिवंगत अर्जुन पाटील यांना सर्व क्षेत्रांतील मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली आहे. काँग्रेसच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा रेखा घरत, उरण तालुका महिला अध्यक्षा निर्मलाताई पाटील, रायगड जिल्हा महिला चिटणीस सोनाली पाटील, शांता म्हात्रे, सरचिटणीस सविता ठाकूर, तुलसा पंडित, पार्वती पाटील, जयश्री पाटील आदी महिला कार्यकर्त्यांनी दिवंगत अर्जुन पाटील यांना शुक्रवारी (ता. १७) श्रद्धांजली वाहिली. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, युवा अध्यक्ष निखिल ढवळे, किरीट पाटील, वैभव पाटील, लंकेश ठाकूर, उत्तम कोळी, नाना गडकरी आदी मान्यवरही उपस्थित होते. त्यांनीही दिवंगत अर्जुन पाटील यांना श्रद्धांजली वाहिली.

दरम्यान, यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल गव्हाणच्या सर्व शिक्षिका, तसेच माजी केंद्रप्रमुख रंजना पाटील, सुहासिनी भगत, वनिता पाटील, मो. का. मढवी गुरुजी, डी. आर. पाटील, मिनल माळी, 'सकाळ' वृत्तपत्र समूहाचे आजी-माजी कर्मचारी वृंद, तसेच पंचक्रोशीतील सर्वच क्षेत्रांतील मान्यवरांचीही पत्रकार कृष्णा पाटील परिवाराच्या सांत्वनासाठी रिघ लागली आहे. अर्जुन पाटील स्मृतिप्रीत्यर्थ दररोज गरुड पुराणाचे वाचन दत्ता म्हात्रे करीत आहेत, तर परिसरातील विविध भजन मंडळेही आपल्या सुमधुर आवाजात आदरांजली वाहात आहेत. प्रसिद्ध भजन गायक निवृत्तीबुवा चौधरी यांचे भजन शनिवारी (ता. १८) होणार आहे. दिवंगत अर्जुन पाटील यांचे उत्तरकार्य मंगळवारी, २१ जुलै रोजी अर्जुन भवन, मोरावे येथे होणार आहे. त्यानिमित्त महेश महाराज साळुंखे यांचे कीर्तन १० ते १२ या वेळेत होणार आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911